# ओटीटी आणि चित्रपट महोत्सव

# प्रादेशिक चित्रपटांसाठी महत्त्वाचे

पुणे, दि. १८ फेब्रुवारी २०२५ : ओटीटी आणि चित्रपट महोत्सव हे दोन्ही प्रादेशिक चित्रपटांसाठी महत्त्वाचे आहेत. अनेक उत्तम प्रादेशिक चित्रपट हे अगोदर महोत्सवांमध्ये झळकतात आणि नंतर त्यांना ओटीटीवर स्थान मिळते, असे मत 'थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हल'चे संचालक संतोष पठारे यांनी व्यक्त केले.

२३ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये आज चित्रपट समीक्षक संतोष पठारे, लेखक समीक्षक गणेश मतकरी, स्वपन मलिक यांनी संवाद साधला.

पठारे म्हणाले, की ओटीटीमुळे प्रादेशिक सिनेमाला जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळते. चित्रपट महोत्सवांमुळे अनेक प्रेक्षकांना अपरिचित असलेल्या चित्रपटांना एक नवीन ओळख मिळते. त्यामुळे हे दोन्ही मार्ग दिग्दर्शकांसाठी खुले ठेवणे गरजेचे आहे. संतोष पठारे म्हणाले, "मराठीत भरमसाठ सिनेमे तयार होत असले तरी काही आश्वासक नवे चेहरे समोर येत आहेत."

चित्रपट समीक्षक गणेश मतकरी यांनी त्यांचे मत व्यक्त करताना सांगितले की, "पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा सामाजिक, राजकीय आणि मानवी नातेसंबंधांवर आधारित अनेक संवेदनशील कथा पाहायला मिळाल्या. तंत्रज्ञान आणि कल्पनाशक्ती यांचा उत्कृष्ट संगम दिसून आला. प्रायोगिक चित्रपटांकडे प्रेक्षकांचा वाढता कलही जाणवला." गणेश मतकरी म्हणाले, की पिफ सारख्या

आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये केवळ चित्रपट प्रदर्शनावर भर दिला जात नाही, तर दिग्दर्शक, लेखक, कलाकार आणि तज्ज्ञांसोबत प्रेक्षकांना थेट संवाद साधता यावा यासाठी मास्टर क्लास आणि कार्यशाळांचे आयोजन केले जाते. या चर्चांमध्ये केवळ चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रियेबद्दलच नाही, तर कथा मांडणी, संवादलेखन, अभिनय, आणि दिग्दर्शन यासारख्या महत्त्वाच्या पैलूंवर चर्चा होतात. या कार्यशाळांमुळे प्रेक्षकांना विविध दिग्दर्शक, लेखक आणि मान्यवर व्यक्तींशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते." असे मतकरींनी सांगितले. '

**'बंगाली सिनेमात चांगल्या कथानकांचा अभाव'**

"सध्याच्या बंगाली सिनेमावर दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीचा पगडा दिसून येत आहे. त्यामुळे जो बंगाली सिनेमा हा एकेकाळी आपल्या दर्जेदार कथानकांसाठी ओळखला जायचा, त्या बंगाली व एकूणच भारतीय सिनेमात आता चांगल्या कथानकांचा अभाव असल्याचे दिसून येत आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट समीक्षक स्वपन मलिक यांनी केले. ते म्हणाले, "आज बंगाली असो वा इतर कोणतीही चित्रपटसृष्टी ही दाक्षिणात्य चित्रपट सृष्टीचे अंधानुकरण करताना दिसून येत आहे. उथळ कथानक, तांत्रिक दृश्यांचा भडिमार, ढीगभर मारामाऱ्या हेच भारतीय सिनेमाचं संपूर्णपणे नसलं तरीही ढोबळपणे बहुतांश चित्र तयार झालेलं दिसतंय. प्रस्थापित फिल्ममेकर्सना एक चांगले कथानक सुध्दा चित्रपट निर्मितीसाठी महत्वाचे आहे याचा विसर पडताना दिसतो आहे." ते पुढे म्हणाले, की आजचे अनेक तरूण फिल्ममेकर्स पुन्हा सिनेमाचे तंत्र नव्याने समजू पाहत आहेत, काही वेगळे प्रयोग करू पाहत आहेत. ही निश्चितच समाधानाची बाब आहे. हे करताना मात्र, सिनेमा गोष्ट सांगण्याचे, वास्तवाचा एक दृकश्राव्य दस्तऐवज असणारे व समाजाला भोवतालचा आरसा दाखवणारे माध्यम आहे हे तरूण पिढीने विसरू नये. भविष्यात चांगल्या कथानकाचे महत्व हे तरूण फिल्ममेकर्सना नक्कीच जाणवेल.